# भारतीय लोकशाही

**कु. प्राजक्ता अजितकुमार वाडकर**
बी .ए भाग ३ मुधोजी महाविद्यालय ,फलटण

**सारांश :** जगतील सर्वात मोठी लोकशाही कोणत्या देशाची असा प्रश्न पडला तर त्याच उत्तर हे भारतीय लोकशाही असेल स्वातंत्र्य प्राप्ती नंतर जगतील राजकीय विचारवंतना हा प्रश्न पडला होता कि ह्या अडाणी व रानटी लोकांना प्रश्न लोकशाही व्यवस्था झेपेल का तरीही गेली ७ दशकाहून अधिक काळ भारतीय लोकशाही जगतील सर्वात मोठी लोकशाही म्हणून थाट मानेने उभी आहे,याचा शोध घेण्यासाठी मी हा शोध निबंध लिहित आहे .त्या साठी मी वर्णात्मक समीक्षा पद्धतीचा वापर करणार आहे .

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, शासन, आव्हाने

प्रस्तावना :-

आज रोजी भारतीय लोकशाहीला **75** वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने 'आजादी चा अमृत महोत्सव' हा शासनातील सर्व स्तरावरती साजरा करीत आहोत.या संकल्पनेतून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. म्हणून मी माझे विचार प्रकट करण्याच्या हेतूने हा शोध निबंध लिहित आहे.

संज्ञा :-

● लोकशाही म्हणजे 'लोकांची सत्ता,लोकांनी चालविलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय.

●अब्राहम लिंकन - लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.

उद्देश :-

प्रस्तुत संशोधन निबंधाचे खालील उद्देश आहेत.

**1)**लोकशाही म्हणजे काय **?** हे समजून घेणे.

**2)** भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय **?** हे अभ्यासणे.

गृहीतके :-

**1)** मा. नरेंद्र मोदी सारखा एखादया सामान्य कुटूंबामध्ये जन्मलेला व्यक्तीसुद्धा भारतीय लोकशाहीच्या समता या तत्त्वामुळे भारताचा पंतप्रधान झालेला आपल्याला पहायला मिळतो.

**2)** मा.'इंदिरा गांधी'ही एक स्त्री असूनसुद्धा भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनण्याचा त्यांना मान मिळाला भारतीय लोकशाहीच्या न्याय व समता या तत्त्वामुळे हे सिद्ध झाले.

**3)** राजू शेट्टीसारखी दुध व्यवसाय करणारी व्यक्तीसुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्न ,मागण्या मान्य करून घेते. हे केवळ शक्य होते ते म्हणजे भारतीय लोकशाहीच्या समता व न्याय या तत्त्वामुळेच शक्य होते.

**4)** भारतीय लोकशाही ही जगातील खरीखुरी लोकशाही आहे. कारण मा. एकनाथ शिंदे यांच्यासारखी रिक्षाचालक व्यक्तीसुद्धा राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचू शकते हे शक्य होते.

लोकशाही उदय आणि विकास :- प्राचीन ग्रीक व रोमन नगरराज्यात लोकशाहीचा जन्म झाला असे म्हटले असले तरी स्त्रियांना आणि गुलामांना शासनकारभारात भाग घेण्याचा अधिकार नव्हता. प्रत्येक व्यक्तीला शासनामध्ये भाग घेण्याचा नैसर्गिक अधिकार आहे ,या विचारणीला **17** व्या शतकापासून जोर चढू लागला. शासन कार्याचे मूल्यमापन जनतेनेच केले पाहिजे व जनतेच्या पाठिंब्यावरच शासनसंस्था अवलंबून असते. अशी विचारप्रणाली रूढ झाली. त्यामुळे राज्यसत्ता डळमळीत होऊन लोकशाहीप्रणाली विकसित झाली लोकशाही या मराठी शब्दाची उत्पत्ती **Dmocracy** या इंग्रजी शब्दापासून झाली असून **Dmocracy** या इंग्रजी

शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील **Demos** आणि **Kartos** या शब्दापासून झाली आहे. थोडक्यात **Dmocracy** म्हणजे लोकांचे राज्य असा अर्थ अभिप्रेत आहे. प्रा. सिली यांच्या मते-ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ती लोकशाही होय. औदयोगिक क्रांतीमुळे लोकशाहीच्या जडणघडणीस पाश्चात्त्य देशात मोठीच चालना मिळाली. नवनवे वैज्ञानिक शोध लागले,महाकाय यंत्रे निर्मान झाली. कारखाने निघून हजारो कामगारांना रोजगार मिळाले.

**15** ऑगस्ट **1947** रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.भारतीय संविधान सभेने भारताची राजकीय प्रणाली म्हणून संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला आणि खरोखरच जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा उदय झाला तो दिवस **26** जानेवारी **1950. 26** जानेवारी **1950** रोजी भारताने गणराज्य प्रजासत्ताक शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारतीय लोकशाही टिकेल की नाही .अशी त्या काळातील राजकीय विचारवंतांना मोठी चिंता होती. कारणही तसेच होते, भारतावरती जवळजवळ इंग्रजांची सत्ता **200** वर्षाहून जास्त होती. त्यातच भारतामध्ये विविध जाती,रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा भारतीय लोकांवरती प्रभाव होता. त्यामुळे ही लोकशाही व्यवस्था अनुकूल आहे की नाही असे बऱ्याच राजकीय विचारवंताना वाटायचे कारण त्यांचे असे म्हणणे होते की गुलामीची सवय असलेल्या या रानटी लोकांना शासन चालवायला जमेल की नाही यात शंकाच होती. पण भारतीय लोकांनी त्यांचे हे मत पूर्णपणे खोडून काढलेले आहे.

भारतीय लोकशाहीला आज रोजी **75** वर्षी पूर्ण झाली आहेत. या कालावधीमध्ये देशामध्ये **17** निवडणूका लोकशाहीच्या पार पडल्या आहेत. या कालावधीत देशाने विविध पक्षाची सरकारे पाहिली आहेत. त्यामध्ये विविध जाती धर्माच्या लोकांनी देशाचे प्रतिनिधित्व केले आहे.काही बोटांवर मोजण्याइतक्या घटना वगळता देशामध्ये शांतता अबाधित आहे. भारतीय लोकशाहीने न्याय, समता, बंधूता था तत्वांचा स्वीकार करून सर्वांना राज्यकारभारात समाविष्ट करून घेतले आहे.आज रोज भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी व विस्तृत लोकशाही म्हणून ओळखली जाते.जगातील सर्व देश भारतीय लोकशाहीचे अनुकरण करण्याचे प्रयत्न करतात.''भारतीय लोकशाही की जगामध्ये आदर्श लोकशाही म्हणून तिचा नावलौकिक आहे.''

**निष्कर्ष**

**1)** भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने नावारूपाला आलेली लोकशाही आहे.

**2)** लोकशाही मध्ये जी गुणधर्म, मूल्य तत्व असतात ते भारतीय लोकशाहीत आढळून येतात .

**3)** लोकशाहीचा अभ्यास करताना राजकीय विचारवंत प्रथम भारतीय लोकशाहीकडे पाहतात. कारण ती लोकशाहीला पुरक आणि पोषक आहे.

**संदर्भ-**

१)देशपांडे, निर्मला ''दिल्लीहून नियोजन नको" पंचायतराज्य, जिल्हा नियोजन आणि विकास परिसंवाद निवडक निबंध, संपादक आणि प्रकाशक प्रा. पी. बी. पाटील **1989** प्र.क. **93**

**2** )डॉ .भोळे भास्कर राजकीय सिद्धांत' प्रशासक पिंपळपुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर - **2002** पृ. क्र .**13 152**

२ ) डॉ. भोळे भास्कर ''भारताचे शासन आणि राजकारण'' प्रकाशक पिंपळपुरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स नागपूर - **2004** पृ.कृ **42**

**4)**डॉ. विभूते, भालबा, प्रबोधन प्रकाशन, ज्योति निवडक निबंध "ग्रामपंचायत लोक सहभाग आणि विकास " प्रसाद कुलकर्णी, इचलकरंजी **2004** पृ. क्र. **8**

**5)** उक्त पृ. क्र. **152**

**6)** उक्त पृ. क्र. **152**

**7)**उक्त पृ. क्र.**42**